राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे-३०.

'STARS' प्रकल्पांतर्गत

## संकलित मूल्यमापन २ : २०२३-२४ : वार्षिक प्रश्नपत्रिका

## इयत्ता - पाचवी विषय : परिसर अभ्यास : भाग 1

**विद्यार्थ्याचे नाव : ----------------------------------ह.क्र . :- ------**

**शाळेचे नाव : ----------------------------------- तुकडी :-**

**केंद्र :- -------- ता .:- -------- जि .:- --------- दिनांक :- / / २०२४**

**अध्ययन निष्पत्तीनिहाय व प्रश्ननिहाय गुणनोंदणी तक्ता**

| अध्ययन निष्पत्ती क्रमांक | तोंडी / प्रात्य. 05.95A.05 | तोंडी / प्रात्य. 05.95A.05 | तोंडी / प्रात्य. 05.95A.02 | तोंडी / प्रात्य. 05.95A.02 | तोंडी / प्रात्य. 05.95A.18 | लेखी 05.95A.02 05.95A.04 05.95A.05 | लेखी 05.95A.05 05.95A.10 | लेखी 05.95A.01 05.95A.10 | तोंडी गुण | लेखी गुण | एकूण गुण | शिक्षक स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्रश्न क्रमांक | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 1 ते 5 | 6 ते 8 | 1 ते 8 | |
| प्राप्त गुण | | | | | | | | | | | | |
| निर्धारित गुण | 1 | 1 | 1 | 1 | 2 | 5 | 10 | 9 | 6 | 24 | 30 | |

## तोंडी चाचणी

प्र. 1) चिक्कीमध्ये असणारे विविध अन्नघटक सांगा. (गुण 1)

प्र. 2) खालीलपैकी लोणच्यामध्ये परिरक्षकाचे काम न करणारा पदार्थ कोणता ते सांगा.

कैरी, तेल, मीठ, हळद, साखर (गुण 1)

प्र. 3) ठिबक सिंचन पद्धतीचा फायदा कोणता ? (गुण 1)

प्र. 4) पारंपरिक वेशभूषा स्पर्धेसाठी तुम्ही कोणत्या कपड्यांची निवड कराल ते सांगा. (गुण 1)

प्र. 5) सायकलचा वापर का करावा? यामागील दोन कारणे सांगा. (गुण 2)

## लेखी चाचणी

**प्र. 6) पुढील प्रश्नांची उत्तरे एका शब्दात लिहा. (गुण 5)**

**1) हरितक्रांतीचे श्रेय या शास्त्रज्ञांना आहे. ____________**

(अ) ए.पी.जे. अब्दुलकलाम (ब) एम. एस. स्वामिनाथन (क) डॉ. होमी भाभा

2) **पहिल्या जोडीतील संबंध ओळखून दुसरी जोडी पूर्ण करा.**

**दूध : उकळणे :: पापड :** ____________________

3) **नावे लिहा. 'ए' जीवनसत्त्वाच्या अभावामुळे होणारा विकार**

____________________

4) **प्रदूषण न करणारे वाहन ओळखून त्याचे नाव लिहा.**

विमान, मोटारसायकल, शिडाचे गलबत, ट्रक, बस ____________________

5) **चूक की बरोबर ते लिहा.**

कृत्रिम उपग्रहांच्या मदतीने होणाऱ्या संदेशवहनाला खूप वेळ लागतो.

____________________

**प्र. 7) पुढील प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा.** **(गुण 10)**

**अ) सांडपाण्यावर प्रक्रिया करूनच ते बाहेर सोडण्याची सक्ती कारखानदारांवर का केली आहे ?** **(गुण 2)**

____________________

____________________

____________________

**ब) देवराईला 'वरदान' का मानले जाते ?** **(गुण 2)**

____________________

____________________

____________________

**क) नवजात बालकांना विविध लसी देण्यात येतात.यामागील कारण लिहा.(गुण 2)**

____________________

____________________

____________________

**ड) स्थायू व वायू पदार्थांच्या कणांची रचना दाखवणाऱ्या 2आकृत्या काढा.(गुण2)**

**इ) तुम्ही काय कराल ?** **(गुण 2)**

1) **'तू खूप बडबड करतोस', असे सर्वजण तुम्हाला सांगतात.**


____________________

2) **साची छान चित्रे काढते, तुम्हाला चित्रकला व्यवस्थित जमत नाही.**

____________________

प्र. 8) पुढील प्रश्न सोडवा. (गुण 9)

अ) आकृतीचे निरीक्षण करा व प्रश्नांची उत्तरे लिहा. (गुण 3)



1) आकृतीमध्ये कोणती इंद्रियसंस्था दाखवली आहे ? (गुण 1)

2) या संस्थेतील भागांची नावे लिहा. (गुण 1)

3) वायूंची देवाणघेवाण कुठे व कशी होते ते स्पष्ट करा. (गुण 1)

ब) तुमची एक वर्षाची बहीण व तुम्ही यांत असणारे 3 फरक लिहा. (गुण 3)

क) चित्र पाहून प्रश्नांची उत्तरे लिहा. (गुण 3)



1) या चित्राचा अर्थ लिहा. (गुण 1)

2) त्या पदार्थाचे शरीरावर होणारे 2 विपरीत परिणाम लिहा.(गुण 2)

विषय : परिसर अभ्यास : भाग 2 (एकूण गुण २०)

## तोंडी चाचणी

तोंडी परीक्षेसाठी प्रश्न (फक्त १) ( गुण ४)

१. प्राचीन नागरी खेळ व सध्याचे खेळ यांच्यातील फरक सांगा.

२. लिपी कशी तयार झाली?

१. रिकाम्या जागी योग्य पर्याय लिहा. (गुण ३)

१. नवाश्मयुगात संपूर्ण गाव हे एक ---------------कुटुंब होते. (विभक्त, विस्तारित, छोटे)

२. मध्यप्रदेश या राज्यात ----------------------येथे पुराश्मयुगीन गुहाचित्र आहेत. (भोपाळ, सांची, भीमबेटका)

३. हडप्पा संस्कृती -----------------नदीच्या खोऱ्यात विकसित झाली.(होयांग हो, सिंधू, नाईल)

२. दिलेल्या प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. (फक्त ३) ( गुण ६)

१. संस्कृती म्हणजे काय?

२. मानवाने तांबे हा धातू का वापरायला सुरुवात केली?

३. बुद्धिमान मानवाला हत्यारांची आवश्यकता का होती?

४. मध्याश्मयुगात मानवी जीवनपद्धती का बदलू लागली होती?

३. टिपा लिहा. ( गुण 4)

१. त्रियुग पद्धती

२. नवाश्मयुगीन घरांची रचना

४. दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा. (फक्त १) ( गुण 3)

१. एखादी प्राणिजात माणसाळविण्याच्या प्रक्रियेच्या तीन मुख्य पायऱ्या कोणत्या?

२. खालील आकृती पूर्ण करा.

